# कोण हा राजू परुळेकर? शरीफ आहे की बदमाश?

ज्याला आधीच प्रसिद्धी मिळाली आहे, ज्याचे नाव गाजत आहे तिथे परुळेकर जाऊन टपकतात आणि त्याच्यावर प्रभाव पाडून जवळीक करतात. पर्यायाने गाढ्याबरोबर नळ्याला यात्रा म्हणतात, तशी यांनाही प्रसिद्धी मिळते. म्हणजेच दुसऱ्यांना प्रसिद्धी मिळवून देण्यापेक्षा त्यांचाच सराईतपणे वापर करून परुळेकर प्रसिद्धी पावलेले गृहस्थ आहेत. जेव्हा याची निरुपयोगिता संबंधीत नामवंत व्यक्तीच्या लक्षात येते, तेव्हा ती व्यक्ती परुळेकर यांना चार हात दूर ठेऊ लागते. त्यामुळे विचलीत झालेले परुळेकर त्याच व्यक्तीवर दुगाण्या झाडून वादळ निर्माण करतात. मात्र त्या वादळाने कुठले पान हलत नाही की, पाचोळा उडत नाही. यांच्या माध्यमातील हस्तकांकरवी परुळेकर मोठे वादळ निर्माण झाल्याचा आभास निर्माण करतात.

राज ठाकरे यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची स्थापना करून खळबळ माजवली. तेव्हाही राजू परुळेकर तिकडे जाऊन पोहोचले होते. मग आपल्याच सहाय्याने राज ठाकरे कसे नव्या पक्षाची धोरणे आखतात व निर्णय घेतात त्याच्या अफवा या महाशयांनी पसरवल्या आणि राज ठाकरे यांना या इसमाला टाळणे अपरिहार्य होऊन गेले. तेव्हा त्यांनी राज व उद्धव ठाकरे यांच्यावर भय्यांच्या म्हणजे उत्तर भारतीयांच्या नादी लागण्याचा आरोप केला होता. 'नवाकाळ' दैनिकात स्वतःची मुलाखत छापून आणली आणि राजपेक्षा उद्धव ठाकरे कसे प्रभावशाली आहेत, त्याचे प्रवचन केले होते. त्यातून त्यांनी उद्धवनी मातोश्रीत स्वीकारले की नाही ते कळू शकले नाही.

हेच महाशय कुमार केतकर आदींच्या मदतीने एन्रॉन प्रकल्प वाचवायला आपली बुद्धी पणाला लावत होते. अण्णांना ब्लॉग लिहिण्यासाठी त्यांनी जे कौशल्य पणाला लावले ते एन्रॉनच्या सेवेतही रूजू केले होते. म्हणूनच एन्रॉनचे भारतातील उपाध्यक्ष संजीव खांडेकर या परुळेकरांचे जीवलग मित्र होते. आता ज्या अण्णांवर कुमार केतकर रोज दुगाण्या झाडत आहेत, त्यांचे निकटवर्ती परुळेकर अण्णांच्या आंदोलनात येऊन टपकलेच कसे? त्यांचा अण्णा किंवा त्यांच्या जनलोकपाल आंदोलनाशी संबंधच काय? आणि असेल तर जंतरमंतरच्या उपोषणापासून तिहार तुरुंगातल्या उपोषणापर्यंत हे परुळेकर महाशय होतेच कुठे? आज केजरीवाल, बेदी व भूषण पितापुत्रांच्या चांडाळ-चौकडीपासून अण्णांचे संरक्षण करायला तलवार उपसून सिद्ध झालेले परुळेकर अण्णा खऱ्या लढाईत गुंतले तेव्हा कुठे होते?

अण्णा आजच आंदोलन करीत नाहीत. मागल्या कित्येक वर्षांपासून अण्णा आंदोलनात आहेत. पण परुळेकर कधी अण्णांच्या सहवासामध्ये दिसले नाहीत. जोपर्यंत अण्णांना प्रचंड प्रसिद्धी मिळालेली नव्हती. तोपर्यंत हे ब्लॉगर महाशय अण्णांकडे फिरकले नव्हते. रामलिला मैदानावर अण्णांचे उपोषण यशस्वी झाले आणि आठवडा संपून अण्णा राळेगण सिद्धीला परतले तेव्हाच विजय कुवळेकरांसह हे परुळेकर त्या गावी दाखल झाले. अण्णांचे विचार त्यांच्या शब्दांत इंटरनेट माध्यमातून जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत घेऊन जाण्याची भुरळ अण्णांना घालून त्यांनी आधी अण्णांसमवेत फोटो काढून घेतले. त्यांच्या मांडीवर लोळण घेऊन आपणच भूषण, बेदी, केजरीवाल यांच्यापेक्षा अण्णांचे निकटवर्तीय असे पुरावे धूर्तपणे निर्माण केले. केतकरांनी १९९७ सालात 'महाराष्ट्र टाईम्स' दैनिकात 'पामराचे घर' म्हणून अण्णांवर लिहिलेला अग्रलेख 'पुण्यनगरी'च्या वाचकांना मी सादर केलाच होता. त्याचप्रकारे अण्णांना खेळवायला हे परुळेकर महाशय अण्णांच्या गोटात दाखल झाले होते. तेव्हाच मला त्याबद्दल शंका आली